# ''महिला सबलीकरण एक सामाजिक आणि आर्थीक क्रांती''

**डॉ. अषोक कोरडे**
**;अर्थषास्त्र विभाग प्रमुखद्ध**
**एस. के. गांधी कालेज कडा**
**ता.आश्टी जि.बीड**
**अर्थषास्त्र अभ्यास मंडळ सदस्य**
**डॉ. बा.आं.म.वि.औरंगाबाद**

**प्रस्तावणा :**

सबलीकरण हा षब्द वंचीत गटात काम करणारे कार्यकर्ते नेहमी वापरतात, महिलांचे सबलीकरण, दलीतांचे सबलीकरण, अदिवासींचे सबलीकरण, कामगाराचे, षेतमजुराचे आणि गरीबांचे संबलीकरण हे षब्द सर्रास कानावर पडतात. पण या संकल्पनेची स्पश्ट चर्चा होत नाही.विविध प्रकारचे सामाजीक, आर्थीक, राजकीय कार्य करणाऱ्या व अषा कार्यात रस असणाऱ्याला याचा उपयोग व्हावा हा या संषोधन लेखाचा हेतू आहे. सबलीकरण म्हणजे बल वाढवणे. बल किंवा बळ हा षब्द इंग्रजीतील ''पॉवर'' षब्दाप्रमाणेच अनेक अर्थांनी वापरला जातो. बल हा षब्द षक्ती या अर्थानेही वापरला जातो. त्यामुळे काहीजन सबलीकरणाला सषक्तीकरण असा प्रतिषब्द वापरतात.

सुप्रसिध्द समाजषास्त्रज्ञ ''मॅक्सर वेबर'' यांनी बळ या षब्दाची व्याख्या '' सामाजिक संबंधात व्यक्तीची इतराचा विरोध असताना आपली इच्छा पुरी करण्याची संभनीयता अषी केली आहे.'' या व्याख्येत काही गोश्टी अनुस्युत आहेत, एकतर ही इच्छा सामाजिक संबंधात असली पाहिजे. सुर्योदय किंवा ग्रहण पाहण्याची इच्छा सामाजिक संबंधात नाही म्हणून या इच्छेच्या व्याख्येत तिचा समावेष होणार नाही. आमदार होण्याची इच्छा सामाजिक संदर्भात आहे. दुसरे म्हणजे व्यक्तीला अषी इच्छा झाली पाहिजे. इच्छाच नसेच तर बळाचा प्रष्नच येत नाही. तिसरे म्हणजे हि इच्छा इतराचां विरोध असला तरी पुरी होण्याची संभवनीयता असली पाहिजे, संभवनीयता म्हणजे खात्री नव्हे. संभवनीयता समस्या अनुभवत असते.

स्त्री सक्षमीकरण म्हणजे काय ''कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, समाजिक, षैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरुशांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करुन देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करुन देणे आणि स्त्री–पुरुश असमानता नश्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात.

महिलांना स्वयंरोजगारासाठी,उद्योगासाठी जेव्हा अर्थसहाμयाची गरज असते तेव्हा त्यांना पत नसल्याची सबब सांगुन बॅका कर्ज देत नाहीत अषा अडचणीच्या वेळी महिलांनी परस्पराच्या बचतीतून पैसे उभारावे. संघटीत महिलांनी आपली बचत स्वतः करावी व गटातुन गरजु महिलांनी पैसे उभारावे. त्यांच्या या बचतीच्या सहाμयाने कर्ज घेऊन छोटा मोठा उद्योग – व्यवसाय सुरु करुन त्यांनी स्वावलंबी व्हावे हा मुख्य उदध्देष महिला बचत गटस्थापना करण्याचा असतो.

महिला बचत गट स्थापन करण्यासाठी खालील मुदध्दे घेतले पाहिजे. ज्या विभागात काम करावयाचे आहे त्यांची भौगोलीक, सामाजिक, आर्थीक माहिती समजावुन घेणे. महिला बचत गट संदर्भात प्रमुख संस्था, अधिकारी, विवीध उपक्रम, इच्छुक महिला, व महिलासांठी कार्यरत असलेली संस्था यांची माहीती घेतली पाहीजे, त्याच बरोबर, बचत गट स्थापन करण्यासाठी बचत गटाची कार्यप्रणाली,उददीश्टये, महत्व, इत्यादी, इत्यादी माहिती करुन घेणे महत्वाची असते.

देषाला स्वातॅंय मिळवुन सत्तर वर्शापेक्षा जास्त वर्शे झाली असली तरी आजही महिला खरोखर सक्षम आहेत की नाही याबाबत विचार करणे महत्वाचे आहे. दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भुमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपुर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अषी विविध नाती

अत्यंत कुषलतेने आणि जबाबदारीने त्या निभावत आहेत. असे असले तरी जगाच्या पाठीवर बऱ्याच ठिकाणी समाजाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. तसेच महिला मोठया प्रमाणात सामाजिक असमानता, अत्याचार, आर्थीक परावलंबित्व आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात. अनादी काळापासून महिलांवरील हि बंधने त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाच्या आड येत आहेत.

भारतातील बहुसंख्य महिला या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौषल्याची कार्ये स्त्रीयांकडे दिली जातात म्हणन स्त्रीयांना आर्थिक क्षेत्रात दुμयम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृश्टया सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला उपजिविकेसाठी षेती, मजुरी, उद्योग, दुध व्यवसाय इत्यादी क्षेत्रात काम करीत असतात. परंतु या कामाची कधीच मोजमाप केली जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही.

**अभ्यासाचे महत्व** :

भारत हा विकसनषील देष आहे. या देषातील लोकसंख्येत निम्मा वाटा असणाऱ्या महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहाबाहेर ठेवणे हे कृत्य जसे अमानवी आहे तसेच ते एकूण प्रवाहालाही मारक आहे. आज आपण जागतिकीकरणाचे वारे पहात आहोत. या प्रवाहात जगातील संपन्न देष एकीकडे दिसतोय आणि दुसरीकडे भारतासारखे अनेक देष आपला विकासाचा वेग वाढवताना दिसत आहेत. अषा या स्थितीत महिलांच्या समस्या वाढत आहेत. याकडे देषातील सरकारने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. स्त्रियांना दुμयम वागणुक देवून विविध मार्गाने महिलाचा मोठया प्रमाणात छळ केला जातोय. या समस्यांतून स्त्रियांना बाहेर काढणे आवष्यक आहे. स्त्रियांचाही देषाच्या मुख्य प्रवाहात येणे ही काळाची गरज आहे. म्हणजेच महिलांचे सबलीकरण होणे होय. समाजातील मजबुती आणि रचनात्मक विकासास कारणीभूत होतील असे विविध कार्यक्रम सुरु झाले पाहिजेत, कि ज्या कार्यामुळे महिला समस्यांवर मात करतील. त्यांचे कौषल्य, आत्मविष्वास वाढेल. महाराश्टभ षासनाने 1994 मध्ये पहिले महिला धोरण जाहिर केले. त्यात बदल करुन 2009 मध्ये दुसरे तर 2014 मध्ये तिसरे महिला धोरण निष्चित केले. या सर्व धोरणामध्ये प्रामुख्याने स्त्रीयांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीयांविशक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमाची भुमिका, स्वयंसहाμयांचा सहभाग, स्त्रीयांना केंद्रस्थानी मानून योजनाची निष्चिती, स्वयंसहाμयता, बचतगटाचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो, षासकीय – निमषासकीय यंत्रणामध्ये स्त्रियांना नोकरीस 30ः आणि स्थानिक स्वराज्य संस्थात 50ः आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराश्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियानाच्या माध्यमातून स्त्रीयांना षिक्षण – प्रषिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात.

**अभ्यासाची उद्दिश्टये :**

1- महिलांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती अभ्यासणे.

2- महिलांच्या सबलीकरणासाठी सरकारचे धोरण अभ्यासणे.

3- महिलांचे ग्रामीण उद्योगातील स्थान अभ्यासणे.

4- महिलाचा षिक्षणातील सहभाग अभ्यासणे.

5- महिलांचे षेतीमधील स्थान अभ्यासणे.

6- 2020–21 मधी अर्थसंकल्पातील महिलांसाठी षासनाने धोरण अभ्यासणे.

**संषोधन पध्दती** :

महिलांची आर्थिक आणि समाजिक स्थिती सुधारण्यासाठी सदर संषोधन लेखन केले असून महिला सबलीकरण ही काळाची गरज आहे. सदर अभ्यासासाठी दुμयम माहितीस्त्रोताचा उपयोग करुन विचार मांडले आहेत.

**महिला आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण** :

मानव समूहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांषी हतोत्साहित करणारे वर्तन, त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हिनत्वाची वागणुक स्त्री जातीला मिळत राहीली आहे. हा भेदभाव दूर करुन स्ि़त्रयांच्या प्रगतीस पोशक वातावरणाी निर्मिती आणि त्याचे सुपालन करणे, मानवी हक्कांविशयी अनेक अंतरराश्टभीय करारात मान्यता मिळवूनही स्त्रीया निर्धन निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैद्यकिय सुविधा, मालमत्तेची मालकी, पतपुरवठा, परीक्षण आणि रोजगारात स्त्रियांना कमी संधी मिळते. त्या पूरुशांच्या तुलनेत राजकिय दृश्या सक्रिय असन्याची षक्यता फारच कमी आहे. आणि त्या घरगुती हिंसाचाराच्या बळी होण्याची षक्यता खुपच मोठी आहे. स्त्रिांची मानसीकता बदलने हे अतिषय महत्वाचे आहे. ग्रामीण भागात स्त्रियां अजुनचही स्वतः निर्णय घंवू षकत नाही इथे त्या पुरुशांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्याची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत याची माहिती त्यांच्या पर्यंत पोहचली पाहिजे. ती अजुनही 100 टक्के सक्षम आहे ते आपण मान्य करु षकत नाही.

1द्ब महिला बचत गटांना त्याच्या छोटया उद्योगासाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. बचतगटांनी तयार केलेल्या वस्तुनां बाजरीपेठ मिळवुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हयात बचत मॉल उभारले पाहिजेत.

2द्ब स्त्रियांचे आणि मुलीचे साक्षरतेचे प्रमाण वाढताना स्त्रिवीशयक धोरणे आणि कायदे अधीक कडक झाले. षासकिय निमषासकीय यत्रंणामध्ये स्त्रियाना नोकरीत 30 टक्के आरक्षण मिळाले. स्थानिक स्वराज्य सस्थांत 50 टक्के आरक्षण मिळाले. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराश्टभ राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियानाच्या माध्यमातुन स्त्रियांना व्यवसाय प्रषिक्षण संधी उपलब्ध झाल्या. कायदेषीर मदतीसाठी राज्य महिला आयोग स्थापन झााला. स्व–उत्पनातील 10टक्के निधी स्त्री आणि बालकल्याणासाठी राखुन ठेवण्याची तरतुद करण्यात आली.

3द्ब षासनाने जिल्हा परिशदांनी त्याच्या स्वउत्पन्नाच्या 10टक्के निधीतुन राबवावयाच्या योजनाची निष्चिती करुन दिली आहे.

यातील सगळयाच योजना प्रत्येक जिल्हा परिशदामार्फत राबविल्या जात नाहीत. उपलब्ध वित्तीय तरतुद आणि स्थानिक गरजा लक्षात घेवून महिला व बालकल्याण समिती या योजनाची निष्चिीती करते. जितकी स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिकदृश्टया सक्षम तितका अधिक निधी महिला व बालकल्याण समितीला मिळतो. षासनाने या योजना दोन गटात विभागलेल्या आहेत. पहिल्या गटात प्रषिक्षण आणि सक्षमीकरणाच्या योजना आहेत तर दुसऱ्या गटात विविध वस्तू खरेदीच्या योजना आहेत.

4द्ब व्यावसायिक व तांत्रिक प्रषिक्षणामध्ये मुलींना आणि स्त्रियांना विविध प्रकारचे व्यवसाय प्रषिक्षण देवून त्याचा व्यक्तीमत्व विकास केला जातो. जसे की केटरींग, ब्युटी पार्लर, दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन, संगणक दुरुस्ती, मोटार डभायव्हींग, मराठी– इंग्रजी टायपिंग, परिचारिका, विमा एजंट, ज्वेलरी मेकींग, कचऱ्याचे विभाजन व व्यवस्थापन, रोपवाटिका, तसेच षोभिवंत फलझााड व औशधी वनस्पतीची लागवड व विक्री, एका लाभार्थी स्त्रीवर योजनेतून जास्तीत जास्त पाच हजार रुपयापर्यंत खर्च केला जातो. प्रषिक्षणाची 10 टक्के रक्कम लाभार्थीला स्वतः भरावी लागते. स्वसंरक्षण व षारिरीक विकास

प्रषिक्षण यात ज्युडो, कराटे आणि योगाचा समावेष होतो. इयत्ता चौथी ते दहावी तसेच महाविलयातील मुली आणि इच्छूक महिला षिक्षक यांचा लाभ घेता येतो.

5द्ध समुपदेषन केंद्राद्वारे कौटुंबिक छळाने त्रासलेल्या तसेच मानसिकदृश्टया खचलेल्या स्त्रियांसाठी मानसषास्त्रीय, कायदेषिर समुपदेषनाचे कार्य या योजनेतुन केले जाते.

6द्ध संगणक प्रषिक्षण योजनेतुन महाराश्टभ ज्ञान महामंडळास मंजुरी दिलेल्या प्रषिक्षण केंद्रात सातवी ते 12 वी उत्तीर्ण मुलींना एम.एस.सी. आय.टी., सी.सी.सी. तसेच या समकक्ष स्वरुपाचे प्रषिक्षण दिले जाते, तालुकास्तरावरील मुलींसाठी वसतिगृहे योजनेतुन स्वंयसेवी संस्थामार्फत दिले जाते.

7द्ध भारतीय समाजामध्ये स्त्री – समस्यांना इतरही आयाम आहेत. वेगवेगळया वर्गातील जाती–जमाती मधील प्रदेषामधील स्त्री समस्याचे स्वरुप वेगवेगळे आहे. षहरी स्त्रियांच्या समस्या, ग्रामीण व षेतमजुर असणाऱ्या स्त्रियाच्या समस्या भटकथा व अदिवासी समाजातील स्त्रियांच्या समस्या वेगवेगळया स्वरुपाच्या आहेत. एकविसाव्या षतकातील नवीन घटकाचा स्त्रियांच्या सामाजिक स्थितीवर मुलगामी परिणाम होत आहे. माहिती तंत्रज्ञान, जागतिकीकरण, नव्या षैक्षणिक संधी, नवे तंत्रज्ञान या घटकाचा या संदर्भातील अभ्यास आवष्यक आहे.

8द्ध महिला सक्षमीकरणासाठी राज्य षासन नेहमीच सकारात्मक दृश्टीकोन ठेवून वेगवेगळया मागील मदत करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपुर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा. त्या जोमाने विकास कार्यात सहभागी व्हाव्यात यासाठी षासन अनेक योजना राबवित आहे. महिला बचत गट, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना आदी योजना वेगवेगळया विभागामार्फत राबविल्या जातात. निराधारांसाठी षासनाचा आधार निरक्षीत महिलासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत आधार गृहाची निर्मिती झाली आहे, दरडोई मानधन दिले जाते. तसेच या महिलांना घराचे भाडे, औशध, प्रसाधन बाबतीतील साहित्य दिले जाते. महिलांच्या आरोग्याची देखील काळजी घेतली जाते. तसेच अन्न,वस्त्र, निवारा यांची सोय करुन त्यांना प्रषिक्षण, षिक्षण तसेच कायदेषीर मार्गदर्षन केले जाते. षहरी भागातील महिलांसाठी सुवर्ण जयंती षहरी रोजगार योजना राबविली जाते. ग्रामीण भागातील आर्थिकदृश्टया दुर्बल असलेल्या स्वयंरोजगाराद्वारे आर्थिक मदत भागविण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून अर्थसहाμय करणारी महिला स्वावलंबन योजना राबविते. कामधेनु योजनेद्वारे आर्थीकदृश्टया स्ववलंबी व्हाव्यात म्हणून अषा महिलांना 50 टक्के काम देण्याचा राज्य सरकारचे धोरणे आहे.

9द्ध महिला उद्योजक व बचतगटानी आपली उत्पादने गुणवत्तापुर्ण करुन आपला आर्थीक विकास साधावा, आर्थीक विकासासाठी महिलांना बचत गटाचे प्रभावी माध्यम उपलब्ध आहे. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून दर्जेदार, नेटके आणि चोख व्यवहार करुन व्यवसाय उद्योगात यषस्वी व्हावे. महिलांना आर्थीक सहकार्यासाठी बॅका त्यांच्या पाठीषी ठामपणे उभ्या राहतील, व्यवसाय आणि उद्योग हाच महिलांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्याचा प्रभावी मार्ग आहे. आजच्या घडीला सर्वच क्षेत्रात महिलांचे योगदान वाढले आहे. महिलांच्या प्रगतीत समाजाने सहकार्यारुपी हातभार लावल्यास त्यांना मोठी झोप घेता येईल.

10द्ध देषाच्या महिल्या पुर्णवेळ महिला अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कृशी, षिक्षण, आरोग्य, जलषक्ती या क्षेत्रासाठी काही महत्वपुर्ण तरतुदी करण्यात आल्या. त्याचप्रमाणे महिलासाठीही काही महत्वाच्या घोशणा करण्यात आल्या त्यामुळे महिला सबलीकरण हा मुदध्दा महत्वाचा ठरला आहे. या देषातील बहुसंख्य महिला आजही आर्थीकदृश्टया परावलंबी आहे. आज देषातील प्रत्येक क्षेत्रातील महिलांनी महत्वपुर्ण योगदान दिले आहे, मुद्रा योजनेअंतर्गत महिला उद्योजकाला एक लाख रुपयाचे कर्ज देण्याचे ठरवण्यात आले. तसेच बचत गटामध्ये लघुउद्योगामध्ये

काम करणाऱ्या महिलाची दखल घेण्यात आली आहे. महिला बचतगटामध्ये, गृहउद्योगामध्ये काम करणाऱ्या महिलाचे जनधन खाते असल्यास त्या खात्याला 5000 रुपयाची ओव्हरडभाफट सुविधा मिळणार आहे. या सुविधांतर्गत 5000 रुपये लवकरच जनधन खात्यात जमा होणार आहे. ज्याप्रमाणे पक्षाला पंखाषिवाय उडता येत नाही. त्याचप्रमाणे महिलांच्या सहभागा षिवाय देष पुढे जाणार नाही. तेव्हा महिलांचे आर्थीक विकासातील योगदान वाढावे लागेल. यासाठी सरकार प्रयत्नषील आहे. असे मत अर्थमंत्रीा निर्मला सीतारामन यांनी सांगितले.

**समारोप :**

भारतामध्ये स्वातँय मिळाल्यानंतर पहिल्या पंचवार्शिक योजनेपासून ते 2020–21 ला सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये, महिलांच्या प्रगतीसाठी, किंवा महिलांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी विविध योजना आखुन भरीव अषी तरतूद केल्याचे निदर्षनास येते. महिला खऱ्या अर्थाने आर्थीक प्रक्रियेमध्ये षेती उद्योग आणि सेवा क्षेत्रामध्ये आघाडीवर कार्य करत आहेत. आज विविध क्षेत्रात महिला आपले स्थान पक्के करताना दिसते. सरकारचे नेहमीच महिला विषेशीकरण, त्यांना षिक्षणाच्या सुविधा, तंत्रज्ञान विशयक ज्ञान, तसेच लघुउद्योग, सुक्ष्म वित, अषा विविध प्रगतीसाठी सहाµयक साधन उपलब्ध करुन दिलेले आहे. आज खुप मोठया प्रमाणात स्त्रिया षिक्षणात आघाडीवर आहेत, मुलापेक्षा मुलीचे षिक्षणातील स्थान प्रबळ ठरत आहे. महिलांना कृशीविशक माहिती उपलब्ध करुन दिली जाते, षेतीमधील नवीन संधी आहेत त्या महिलां पर्यंत पोहचवण्याचे कार्य केले जात आहे. बचत गटाच्या माध्यमातून अनेक प्रक्रिया उद्योग, लघु उद्योग महिलांपर्यंत येत आहेत. त्यांचे राहणीमाण, जिवनमान उंचावण्यास मदत होत आहे. बचतीमधून गुंतवणुक वाढत आहे. बांगलादेषातील महिलांचा विकास करणारे महिला बचत गटाचे प्रणेते महमद युनुस यांच्या कार्यातुन प्ररित होवून भारतातील बचत गट मोठी उलाढाल करत आहे. भारतात महिला सबळ होत असल्याचे दिसून येत आहे. स्त्रियांच्या स्थितीचा विचार करता षिक्षण व राजकीय प्रतिनिधीत्व याबाबतीत स्थिती सुधारली असली तरी आर्थीक स्तर व आरोग्य या क्षेत्रात अजुन मोठे यष आलेले नाही. भारताच्या महिलाविशयक योजनावर आणि प्रकल्पावर अर्थसंकल्पाचा खर्च वाढून तो एकूण अर्थसंकल्पाच्या 18 टक्केवर गेला आहे. ‘‘बेटी बचाओ बेटी पढाओ’’ महिलांसाठी राश्ट्रीय अन्नसुरक्षा, महिला कामगाराच्या मजुरी संदर्भातील धोरणे अषा तरतुदी आणि यातही अनुसुचित जाती – जमातीच्या महिलांसाठी वेगळी तरतूद आहे. महिला योजनावरील खर्चातही गेल्या दहा वर्शात चार पटींनी वाढ झाली आहे.

संदर्भ :

1- महिला सबलीकरण – संभाजी देसाई
2- स्त्री सक्षमीकरण काळाची गरज – दैनिक लोकसत्ता
3- भारतीय राजकारणातील स्त्रिया, ीजजचेधूपापचमकपं
4- षासनाच्या साथीने महिला सक्षमीकरण – दै. सकाळ
5- अर्थसंकल्प 2020–21